प्रेसनोट दिनांक ०७/०२/२०२५

# शहर गुन्हे शाखेकडून, घरफोडी चोरीसह, चोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस.

---

**(अ)** दिनांक ०१/०२/२०२५ रोजी पहाटे ०४.०० वा. चे सुमारास कौतम चौक येथील महाराष्ट्र ॲग्रीकल्चर कंन्सलटन्सी लिमीटेड, सोलापुर हे खताचे दुकानाचे शटर उचकटुन दुकानात प्रवेश करुन दुकानातील ७,२००/- रुपये चोरी झालेबाबत, यातील फिर्यादी- वैभव भिमाशंकर जम्मा यांनी, दिलेल्या तक्रारीवरुन, जेलरोड पोलीस स्टेशन, सोलापुर शहर येथे **गुरनं.५६/२०२५, भा.न्या.सं.क. ३३१(३), ३३१(४), ३०५(ए)** प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

त्याअनुषंगाने, **गुन्हे शाखेकडील सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथक** यांना, दि.०३/०२/२०२५ रोजी खात्रीशिर बातमी मिळाली की, " चार इसम हे जुना पुना नाक्याजवळील आकांक्षा टुर्स ट्रॅव्हल्स जवळ, सोलापुर येथे संशयीतरीत्या थांबले" आहेत. प्राप्त बातमीची शहा-निशा करुन, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने, **इसम नामे-(०१) सुरेश नारायण रेकुला वय-५२ वर्ष, रा.१/१५-१४/ए, व्यंकटपुरा, लोथकुंटा, मलकाजकिरी त्रिमुलघेरी, तेलंगणा, (२) अशोक गंगाधरप्पा, ऊर्फ अशोक एच.जी, वय-२७ वर्ष, रा.हनमंतपुरा अरुर, जिल्हा-चिक्का बल्लापुर, राज्य-कर्नाटक, (३) टी.एन. मोहन नारायणस्वामी, वय-४२ वर्ष, रा.हनमंतपुरा अरुर, जिल्हा-चिक्का बल्लापुर, राज्य-कर्नाटक, (४) अजमत अब्दुल जब्बार सय्यद, वय-३७ वर्ष, रा.२६/४/३०६१, विष्णु टॉकीज, बालाजी नगर, हिंदपुर, जिल्हा-अनंतपुर, राज्य-आंधप्रदेश** यांना ताब्यात घेतले. त्यानंतर, त्यांचे ताब्यातुन, गुन्हयातील ७,२००/- रुपये रोख रक्कम व गुन्हयात वापरलेले विविध कंपनीचे ०४ मोबाईल फोन असा एकुण-६२,२००/-रुपये किमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सदरचे आरोपी हे, वरील प्रमाणे ०३ वेगवेगळया राज्यातील असुन, त्यानी एकत्रित येवुन, गुन्हे केलेले आहेत. नमूद आरोपींविरुद्ध महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक या राज्यात घरफोडी-चोरीचे गुन्हे दाखल आहेत. तसेच नमूद आरोपी हे, रामदास पेठ पोलीस ठाणे, **अकोला** गु.र.क्र.१०७/२०२४ भा.द.वि.क.४५७, ३८० अन्वये दाखल गुन्ह्यामध्ये **पाहिजे आरोपी** आहेत.

**(ब)** तसेच सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने, **आरोपी नामे-१) नागेश प्रभाकर चापे, वय-१९ वर्ष, रा.प्लॉट नं.३२, वर्जेश्वर नगर, अ.कोट रोड, सोलापुर, २) राकेश सुरेश चन्ना, वय-४२ वर्ष, रा.सायन कोळीवाडा, मुंबई, ३) रामहरी दत्तू पवार, वय-३९ वर्ष, रा.कर्देहळळी, ता.उत्तर सोलापुर, ४) ओंकार आनंद चिलका, वय-२५ वर्ष, रा.२१७४ एच ग्रुप विडी घरकुल, सोलापुर** यांना ताब्यात घेवुन, त्यांचेकडुन खालील मोटार सायकल व सोने चोरीचे गुन्हे उघडकीस आले असुन, ते खालीलप्रमाणे :-

| अ.क्रं | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | जप्त मुददेमाल |
|---|---|---|---|
| 1 | जेलरोड | 573/2024, BNS-303(2) | स्प्लेंडर प्लस क्रं.MH-25-AQ-9908 |
| 2 | जेलरोड | 18/2025, BNS-305(A) | 08.48 ग्रॅम वजनाचे सोन्याचे 05 नग टॉप्स |
| 3 | जेलरोड | 05/2025, BNS-303(2) | एच.एफ. डिलक्स क्रं. MH-13-CR-9578 |
| 4 | सदर बझार | 71/2025, BNS-303(2) | ACCESS 125 स्कुटी गाडी क्रं. नं-MH-13-EE-5186 |
| 5 | चतु:श्रृगी पोलीस ठाणे, पुणे शहर, | 581/2023, IPC-379 | स्प्लेंडर प्लस नं-MH-14-HT-7938 |

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेकडील सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने वरील नमुद एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ०२,५२,७००/-रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.**

सदरची कामगिरी मा. एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, श्री.राजन माने, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/विजय पाटील व पोलीस अंमलदार पोह/राहुल तोगे, आबाजी सावळे, अजिंक्य माने, धिरज सातपुते, विठठल यलमार, चालक- सतीश काटे, काळे व सायबर पोलीस ठाणे कडील मच्छिंद्र राठोड व प्रकाश गायकवाड यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापुर शहर,**
**यांचे करीता.**